वैध मापन शास्त्र यंत्रणेतील, सह नियंत्रक, वैधमापन शास्त्र (राजपत्रित, गट-अ) या संवर्गाची दि.०१ जानेवारी, २०२६ या दिनांकास अनुसरुन अंतिम जेष्ठतायादी.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : वैमाशा-२०२५/प्र.क्र.०५/ग्रासं-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक- २५ नोव्हेंबर, २०२६

वाचा :- १) शासन अधिसूचना, दि.२१ जून, २०२१
२) शासन निर्णय क्रमांक : वैमाशा-२०२६/प्र.क्र.०३/ग्रासं-३, दिनांक ०६ मार्च, २०२६

शासन निर्णय-

उपरोक्त संदर्भिय २ येथिल शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ नियम ५ (१) नुसार सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र संवर्गात कार्यरत असणाऱ्या दि.१ जानेवारी, २०२६ या दिनांकास अनुसरून तात्पुरती जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीबाबत कोणत्याही अधिकाऱ्यांकडून सूचना व हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. यास्तव आता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ नियम ५ (३) नुसार सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, गट-अ (राजपत्रित) या संवर्गाची ज्येष्ठतायादी अंतिम करण्यात आली असून ती या शासन निर्णयासोबत **परिशिष्ट "अ"** येथे जोडण्यात आली आहे.

२. सदर जेष्ठतासूची तयार करताना महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतूदींचा अवलंब करण्यात आला आहे. सदरहू सामायिक जेष्ठतासूची सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र या संवर्गात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची आपापसातील जेष्ठता निश्चित करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

३. नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र या संवर्गाची सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अंतिम जेष्ठतायादी सदर संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६११२५१२१९०८५१०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c10114 1f0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.11.25 12:20:36 +05'30'

(पूजा मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) सर्व संबंधित सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र (नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांच्यामार्फत)

प्रत-
१) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य. मुंबई.
२) सर्व विभागीय सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र.
३) निवडनस्ती (संग्रहार्थ).

शासन परिपत्रक क्र. वैमाशा- २०२६/प्र.क्र.०३ /ग्रासं-३, दि. २५ नोव्हेंबर, २०२६ सोबतचे परिशिष्ट “अ”

१) संवर्गाचे नांव :- सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र

२) वेतनश्रेणी :- एस - २०- ५६१००-१७७५००

३) १ जानेवारी, २०२६ या दिनांकास अनुसरुन अंतिम जेष्ठतासूची.

नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक	शासकीय कर्मचाऱ्याचे नांव	सह नियंत्रक पदावरील नियुक्तीचा मार्ग	जन्म दिनांक	प्रवर्ग	संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक	ज्येष्ठतेचा दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	
१	श्री. ल. बे. हारोडे	पदोन्नती	२५.०६.१९६८	भज-ब	०१/०६/२०१८	०१/०६/२०१८	३०/०६/२०२६	
२.	श्री. शि. स. काकडे	पदोन्नती	१४.११.१९७२	खुला	०१/०६/२०१८	०१/०६/२०१८	३०/११/२०३०	
३.	श्रीमती सीमा बैस	पदोन्नती	१२.१२.१९७२	खुला	०४/०६/२०१८	०४/०६/२०१८	३१/१२/२०३०	
४.	श्री. नरेंद्रसिंह मोहनसिंह	पदोन्नती	१४.०९.१९७२	विजा (अ)	०८/०६/२०२०	०८/०६/२०२०	३०/०९/२०३०	
५.	श्री. पा. म. बिरादार	पदोन्नती	०५.०३.१९७०	खुला	०७/१०/२०२१	०७/१०/२०२१	३१/०३/२०२८	
६.	श्री. सु. ह. चाटे	पदोन्नती	१५.०७.१९६९	भज-ड	०७/१०/२०२१	०७/१०/२०२१	३१/०७/२०२७	
७.	श्री.व्ही.पी.पवार	पदोन्नती	०१.०६.१९७०	इमाव	२६/०८/२०२४	२६/०८/२०२४	३१/०५/२०२८	दिव्यांग

++++++